तरुण भारत संवाद शनिवार, ११ जुलै २०२६



कोल्हापूर : प्रदर्शनाची पाहणी करताना कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे व इतर मान्यवर.

# आवड जोपासल्यास आयुष्य आनंदी होईल

प्रतिनिधी, कोल्हापूर

- अभयकुमार साळुंखे यांचे प्रतिपादन
- विवेकानंदमध्ये 'स्पंदन कला प्रदर्शन २०२६' उत्साहात

सध्याच्या धकाधकीच्या जीवनामध्ये बी. व्होक. सारख्या विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारे कौशल्याधारित अभ्यासक्रमांची आवश्यकता आहे. प्रत्येकामध्ये ईश्वरदत्त एखादी कला असते, त्या कलेचा छंद जोपासता आला पाहिजे. आवड जोपासल्यास आयुष्य आनंदी होईल. असे प्रतिपादन श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष माजी प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी केले.

विवेकानंद कॉलेजच्या बी. व्होक. विभागामार्फत ग्राफिक डिझाईन, ॲनिमेशन ॲण्ड फिल्म् मेकींग आणि फोटोग्राफी व व्हिडीओग्राफी विद्यार्थ्यांच्या वर्षभरातील कलाकृतींचे 'स्पंदन कलाप्रदर्शन २०२६" चे उदघाटन श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष माजी प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमास संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, ए. आर. पाटील कन्या महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. श्रुती जोशी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, प्रा. डॉ. सी. बी. पाटील, महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. एस. आर. कट्टीमनी व बी. व्होक विभागाचे डीन डॉ. ए. एस. महात आदी मान्यवर उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांच्या मार्गदर्शनाखाली व विभागाचे डिन डॉ. ए. एस. महात, प्रा. राहुल इंगवले व सहकाऱ्यांनी कलाप्रदर्शनाचे आयोजन केले होते.

प्रास्ताविक प्रा. डॉ. सी. बी. पाटील यांनी केले. आभार प्रा. मंगेश खोले यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. सुप्रिया पाटील यांनी केले. प्रदर्शन ११ जुलै पर्यंत सुरू आहे.

11/7/26

पुढारी MY कोल्हापूर शनिवार,११ जुलै २०२६

# 'विवेकानंद'मध्ये स्पंदन कलाप्रदर्शनचे उद्घाटन

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजमधील बी.व्होक. विभागातर्फे आयोजित 'स्पंदन कलाप्रदर्शन'चे उद्घाटन संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते झाले. प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी साकारलेली फोटोग्राफी, ग्राफिक डिझाईन, ॲनिमेशन, फिल्ममेकिंग, पेंटिंग्ज, हस्तकला व इन्स्टॉलेशन यांचे प्रदर्शन मांडण्यात आले आहे. हे प्रदर्शन ११ जुलैपर्यंत सर्वांसाठी खुले आहे. यावेळी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्राचार्या डॉ. श्रुती जोशी, प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, प्रा. डॉ. सी. बी. पाटील आदी उपस्थित होते.